# प्रेसनोट

दिनांक १७/०९/२०२१

## लाच स्विकारले प्रकरणी खाजगी इसम यांचेवर कारवाई

| | |
|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग** | पुणे परीक्षेत्र, सातारा युनिट |
| **गुन्हा नोंदक्रमांक** | गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया चालु आहे. |
| **कलम** | भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा कलम ७ अ |
| **आरोपींचे नाव व कार्यालय** | विलास भानूदास किर्तीकुडाव, (किर्तीकर) वय-४० वर्षे, प्लंबर, (खाजगी इसम) रा.मु.पो.कोडोली ता.जि.सातारा यांना लाच स्विकारले प्रकरणी रंगेहात पकडले. सातारा लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई. |
| **घटनास्थळ** | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, लष्करी पाणीपुरवठा केंद्र सातारा कार्यालयाचे समोरील कटयावर |
| **मागणी केलेली लाचेची रक्कम** | १५००/- रुपये (एक हजार पाचशे रुपये) |
| **लाच स्विकारली रक्कम** | १५००/- रुपये (एक हजार पाचशे रुपये) |
| **थोडक्यात माहीती** | पडताळणी व सापळा दिनांक :-१७/०९/२०२१<br>यातील तक्रारदार यांचे नवीन नळ कनेक्शन देण्यासाठीचा अर्ज, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण लष्करी पाणीपुरवठा केंद्र, सातारा या कार्यालयाकडुन मंजुर करून देण्यासाठी विलास किर्तीकुडाव, प्लंबर (खाजगी इसम) यांनी १००/- रुपये अर्जाची शासकीय शुल्क मागितले व त्याची रितसर पावती देणार असल्याचे सांगुन १५००/- रूपयांची लाच मागणी केली. त्यानंतर तक्रारदार यांच्याकडून आरोपी यांने १५००/- रूपये लाच रक्कम स्विकारल्यावर रंगेहात पकडले आहे. यावरुन विलास भानूदास किर्तीकुडाव, खाजगी इसम यांचेविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. |
| **सापळा पथक** | सदरची कारवाई श्री.राजेश बनसोडे, पोलीस अधीक्षक तसेच मा.सुहास नाडगौडा, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपअधीक्षक श्री.अशोक शिर्के, पोलीस निरीक्षक सचिन राऊत, सहा.पोलीस उपनिरीक्षक आनंदराव सपकाळ, विजय काटवटे, पो.हवा.भरत शिंदे, संजय साळुंखे, पो.ना संजय अडसुळ, प्रशांत ताटे, विशाल खरात, मपोना श्रद्धा माने, पो.कॉं.संभाजी काटकर, तुषार भोसले, निलेश येवले, व म.पो.कॉं.शितल सपकाळ, चालक पो.ना.मारुती अडागळे सर्व नेमणुक ॲन्टी करप्शन ब्युरो, सातारा यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारा संबंधीत काही माहीती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवकाबद्दल तकार असल्यास त्वरीत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्यशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता:- सि.स.नं ५२४/अ, जिल्हा कोषागार कार्यालयाजवळ, सदरबझार सातारा

संकेत स्थळ :- acbmaharashtra.gov.in

ईमेल:- dyspacbsatara@gmail.com

ऑनलाईनतक्रार ॲप :-www.acbmaharashtra.net

टोल फ्रीक्रमांक :- १०६४

दुरध्वनीक्रमांक:- ०२१६२-२३८१३९

मा सादर

(अशोक शिर्के)

पोलीस उपअधीक्षक,

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सातारा.